# अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलन (दुसरे)

## आयोजक

## एमजीएम आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे

### ८ आणि ९ ऑक्टोबर २०२६

# निबंध स्पर्धा

स्नेही मित्र आणि विचारवंत बंधू-भगिनींनो,

“माझे जीवन हाच माझा संदेश आहे,” असे मानणाऱ्या महात्मा गांधीजींच्या विचारांनी संपूर्ण जगाला अहिंसा, सत्य आणि शांततेचा मार्ग दाखवला. आजच्या २१ व्या शतकात तंत्रज्ञान आणि आधुनिकतेचा वेगाने विस्तार होत असतानाच कौटुंबिक, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक नवी आव्हाने उभी ठाकली आहेत. अशा अशांत आणि गुंतागुंतीच्या काळात गांधीजींची तत्त्वे अधिक प्रासंगिक ठरत आहेत.

तरुणांमध्ये गांधीवादी विचारांची रुजवण व्हावी, त्यांच्यातील विचारशक्तीला चालना मिळावी आणि आजच्या समस्यांवर गांधीवादी दृष्टिकोणातून उकल शोधता यावी, या उद्देशाने 'अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलन (दुसरे)' अंतर्गत या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. गांधीजींच्या विचारधारेवर प्रकाश टाकणे आणि नव्या पिढीचे विचारमंथन घडवून आणणे, हा या निबंध स्पर्धेचा उद्देश आहे.

**स्पर्धेचे विषय :**

१. २१ व्या शतकातील गांधीवादी अहिंसेची महत्व

२. जागतिक शांतता आणि गांधीजींचे विचार

३. गांधीजींची शाश्वत जीवनशैली

४. गांधीजींचे पर्यावरण विषयक विचार

५. गांधीजींची 'हिंद स्वराज्य' संकल्पना

६. ग्रामस्वराज्य ते स्मार्ट व्हिलेज

७. ग्रामीण स्वावलंबनाची सद्य: स्थिती आणि आव्हाने

८. सत्याग्रह : आधुनिक लोकशाही चळवळींचे प्रभावी साधन

९. स्त्री-सक्षमीकरण आणि गांधीजींचे विचार

१०. महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार

११. आजची पत्रकारिता आणि गांधीजी

१२. जागतिक गाव : दृष्टिकोन आणि आचरण

१३. लोकशाही तत्त्व आणि आचरण

१४. बहुलतावाद, सर्वसमावेशकता आणि राष्ट्रवाद

**टीप : निबंध लेखनात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वापर करु नये. निबंधातील वाङमय चौर्य तपासले जाईल.**

# पारितोषिके

| गट: ७ वी ते १०वी (पंधरा वर्षा वर्षांखालील ) | गट:कनिष्ठ महाविद्यालय ते पदव्युत्तर पदवी (पंधरा वर्षांवरील) |
|---|---|
| प्रथम ८०००/- | प्रथम १००००/- |
| द्वितीय ६०००/- | द्वितीय ७०००/- |
| तृतीय ४०००/- | तृतीय ५०००/- |
| उत्तेजनार्थ : ५ बक्षीस (प्रत्येकी १०००/- ) एकूण ५०००/- | उत्तेजनार्थ : ५ बक्षीस (प्रत्येकी १०००/- ) एकूण ५०००/- |
| **एकूण बक्षीस २३०००/-** | **एकूण बक्षीस २७०००/-** |

## नियम

- स्पर्धेतील सहभाग गट : ७ वी ते १० वी, गट: कनिष्ट महाविद्यालय ते पदव्युत्तर पदवी असेल.
- कोणत्याही विषयावरील एक निबंध टाईप केलेला असावा.
- निबंध स्वतंत्र पानावर असावा (एका बाजूने).
- परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

## शब्दमर्यादा:

- शाळा गट : ७०० ते १००० शब्द
- कनिष्ट महाविद्यालय ते पदव्युत्तर पदवी : १५०० ते २००० शब्द
- भाषा: मराठी, उर्दू ,हिंदी (Unicode Mangal, 11 Pt) आणि इंग्रजी (Times New Roman १२ Pt space १.५ between line)

## माहिती :

निबंधाच्या पहिल्या पानावर पूर्ण नाव, गट, शाळा महाविद्यालयाचे नाव, मोबाईल नंबर व पत्ता स्पष्ट लिहावा.

## निबंध पाठविण्यासाठी ई-मेल व अंतिम दिनांक :

- ई-मेल : essaycompetition@mgsindia.net
- वेबसाइट : www.mgmu.ac.in, www.mgsindia.net
- निबंध पाठवण्याची अंतिम तारीख : 30 सप्टेंबर २०२६
- स्थळ: एमजीएम परिसर, एन-६, सिडको, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र, भारत

**टीप :** ८ आणि ९ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलन (दुसरे) यात विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

| अधिक माहितीसाठी संपर्क | |
|---|---|
| डॉ. आशा देशपांडे | : ९८२३०४२००३ |
| डॉ. भागवत वाघ | : ९९२२७७३३०७ |
| डॉ.मारोती गायकवाड | : ७९७२३८२५५६ |

